# मनोगत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत एम. फिल. (मराठी) पदवीसाठी लघुप्रबंधाच्या स्वरूपात मांडण्यासाठी व. बा. बोधे यांच्या 'कोकरउड्या व रानपालखी या आत्मकथनांचा अभ्यास' हा विषय निवडला आहे. तसेच पाहता व. बा. बोधे यांचा परिचय बी. ए. ला असतानाच झाला. ते एक कथाकथनकार व एक वक्ता म्हणून त्याचवेळी त्यांचे 'कोकरउड्या' हे आत्मकथन वाचनात आले व मनाला विलक्षण चटका लावून गेले. नंतर 'रानपालखी' हे सुद्धा वाचनात आले. तेसुद्धा मनापासून आवडले. त्यामुळे त्यांच्या आत्मकथनाचा एम. फिल. संशोधनासाठी अभ्यास करावा अशी मनात इच्छा निर्माण झाली आणि डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाची रूपरेखा तयार केली. आज हा अभ्यास पूर्णत्वाकडे जात असताना मनाला अतीव आनंद होत आहे.

हा अभ्यास करत असताना माझे मार्गदर्शक, माझे सर्व गुरुवर्य, ग्रंथालय, सहकारी मित्र-मैत्रिणी, नातलग या सर्वांच्या माझ्यावरील स्नेहाचे या क्षणी स्मरण होत आहे. या सर्वांचा माझ्या पाठीवरती हात नसता तर माझ्यासारख्या विद्यार्थ्याकडून हे संशोधन कार्य पूर्णत्वास गेलेही नसते. याची मन:पूर्वक जाणीव आहे.

रयत शिक्षण संस्थेचे सचिव व छ. शिवाजी कॉलेजचे प्राचार्य जे. जी. जाधव साहेब, सहसचिव जी. एस. खोत सर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी पाटील, डॉ. शिवलिंग मेनकुदळे (मार्गदर्शक), प्रा. व. बा. बोधे (लेखक), प्रा. सौ. मानसी लाटकर, प्रा. डॉ. सौ. अर्चना चव्हाण, प्रा. डॉ. सुभाष आहेर, प्रा. आबासाहेब वैराट, प्रा. श्रीकांत बोधे, प्रा. युवराज खरात, तसेच चौंडेश्वरी एज्युकेशन सोसायटी रहिमतपूर संस्थेचे सचिव प्रा. अरुण माने, प्रा. संजय बागल, प्रा. अतुल भोसले, प्रा.नाथाजी गायकवाड, प्रा. नितीन जोशी, प्रा. भागवत लोखंडे, प्रा. राहूल सकुंडे आणि सदर प्रबंधाची आकर्षक बांधणी व कॉम्प्युटर टायपिंग करून देणारे मे. रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, साताराचे श्री. मुकुंद ढवळे, राजू कुलकर्णी व त्यांचे सर्व सहकारी, कुटुंबीयांचा तसेच सर्व मित्रपरिवार आणि हितचिंतकांचे मनापासून शतश: आभार.

# भूमिका

प्रा. व. बा. बोधे यांना प्राध्यापक, कथाकथनकार, एक मिश्किल विनोदी वक्ता, ग्रामीण कादंबरीकार म्हणून महाराष्ट्र ओळखतो. त्यांच्या कादंबरीलेखनाने त्यांची साहित्य निर्मितीची संख्या आजवर शंभरपेक्षा अधिक असून आजही व. बा. बोधे लेखनात गुंतून असतात. मराठी साहित्याच्या क्षेत्रात स्वत:चा वेगळा ठसा निर्माण केला आहे. व. बा. बोधे यांनी सर्वच वाङ्मयप्रकाराचे लेखन करूनसुद्धा त्यांची साहित्याच्या क्षेत्रात इतर लेखकांच्या तुलनेने दखल घेतली जात नाही.

बोधे यांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण कष्टकरी भटक्या जातिजमातींचे वास्तव दर्शन करून मराठी कादंबरी वाङ्मयात मोलाची भर घालण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ग्रामीण भागातील लोकांचे जीवन, राहणीमान, संस्कृती, राजकारण, खेड्याचे बदलते स्वरूप या सर्व घटकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या एकूण साहित्यकृतींवर मोजक्याच समीक्षकांनी समीक्षा केल्याचे आढळते. त्यात प्रामुख्याने डॉ. आनंद यादव, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. सुधाकर भोसले, डॉ. यशवंत पाटणे, डॉ. शंकरानंद येडगे, डॉ. रवींद्र कोल्हे, प्रा. प्रकाश इनामदार, प्राचार्य रमणलाल शहा अशा लोकांनी समीक्षा केलेली आहे.

व. बा. बोधे यांच्या आत्मकथनाच्या संदर्भात विचार करता त्यांची दोन्हीही आत्मकथने मराठी ग्रामीण आत्मकथनातील महत्त्वपूर्ण आत्मकथने आहेत. तथापि दोन्ही आत्मकथनांचा अभ्यास मात्र आजवर झालेला नाही. तो होणे महत्त्वाचे वाटले म्हणून या दोन्ही आत्मकथनांचा संशोधनात्मक अभ्यास करण्याची भूमिका होती. दलित आत्मकथनांच्या तुलनेने ग्रामीण आत्मकथने संख्येने कमी आहेत. परंतु इतर आत्मकथनापेक्षा बोधे यांची आत्मकथने वेगळ्या अनुभवविश्वातून निर्माण झालेली आहेत. कोकरउड्यातून त्यांनी जन्मापासून प्राध्यापक होईपर्यंतचा जीवनपट मांडला. त्यामध्ये त्यांना आलेले अनुभव वेगळ्या विश्वात नेहुन सोडणारे आहेत. बोधे स्वत: दलित नसून त्यांच्यासारखे जीवन जगले याची साक्ष कोकरउड्यातून मिळते. त्यांना त्या वयात आलेले अनुभव इतरांना प्रेरणा देणारे आहेत. दारिद्रयात जन्माला येऊनसुद्धा एक प्राध्यापक वक्ता लेखक म्हणून त्यांनी मिळविलेला लौकिक नवोदित लेखकांसाठी दिशा देणारा आहे.

'रानपालखी' या आत्मकथनात त्यांनी प्राध्यापक झाल्यापासून पंचवीस वर्षांचा कालखंड मांडला आहे. त्यात त्यांना आलेले अनुभव, मानसन्मान, वाङ्मयीन निर्मिती यांची वास्तवदर्शी चित्रणे रानपालखीतून केली आहे. हे सर्व करीत असताना त्यांचा गावाशी, गावच्या मातीशी नाळ तुटू दिलेली

नाही. रानपालखीतून गावावरील प्रेम, निसर्गावरील प्रेम, पशु-पक्षी प्राण्यांचा जिव्हाळा, ग्रामदैवताची यात्रा चांगली होण्यासाठी त्यांची असणारी धडपड, गावाचे बदलते स्वरूप, लोकसंस्कृतीची जपणूक या सर्वांची दखल त्यांनी साहित्यातून विशेषत: आत्मकथनातून घेतली आहे. त्यामुळे व. बा. बोधे एक प्राध्यापक असूनसुद्धा त्यांच्यातील ग्रामीण माणूस मात्र आजही जिवंत आहे.

एकूणच 'कोकरउड्या व रानपालखी' या आत्मकथनांचा विचार करता त्यांच्यातून ग्रामीण माणूस, त्याची जगण्याची शैली, रांगडेपणा, सोशिकता त्याचबरोबर ग्रामीण संस्कृतीतील सणवार, जत्रा, प्राण्यांच्या वरचे प्रेम, ग्रामीण खेड्याचे बदलते स्वरूप यांवरती प्रकाश टाकला आहे. म्हणून ही आत्मकथने वेगळ्या वळणाची आहेत. आजवर अशाप्रकारचे फारसे चित्रण आत्मकथनातून झाल्याचे आढळत नाही. तसे होणे महत्त्वाचे वाटते. म्हणून या आत्मकथनाचा अभ्यास होणे महत्त्वाचे वाटते. त्यामुळे संशोधनासाठी हा विषय निवडून अभ्यास केला आहे. हे संशोधन इतर अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल अशी माझी अपेक्षा आहे.

**डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
**मार्गदर्शक**

**नंदकुमार शेडगे**
**अभ्यासक**